# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172


*No: CGRF/AZ/AUR/ U / 237 / 2009 / 71* *Date :-*

*To,*
*The Executive Engineer ( Administration)*
*O/O Superintending Engineer ,*
*O&M Urbn Circle , M.S.E.D.C.L.*
*Aurangabad.*

*Sub:- Forwarding of grievance in respect of Shri Chandrashekar A .Gangawal Plot No.74-37-4, Fazalpura, Labour Colony Aurangabad. ( Consumer No.490010266294)*

*Dear Sir,*

*Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Shri Chandrashekar A. Gangawal Plot No.74-37-4, Fazalpura, Labour Colony* Aurangabad.

*You are requested to submit your para wise reply on the grievance at the time of hearing. The hearing in the matter will be held on 04.08.2009 at 11= 30 Hrs. onwards.*

*Encl: As above*

*Member/Secretary*
*CGRF(AZ) MSEDCL*
*Aurangabad.*

*Copy to:-*
*Shri Chandrashekar A .Gangawal*
*Plot No.74-37-4,*
*Fazalpura, Labour Colony*
Aurangabad.

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/२३७/२००९/७१**

**तक्रार दाखल दिनांक :- १७/०७/२००९**
**निकाल दिनांक :- ०१/०९/२००९**

**श्री चंद्रशेखर अशोककुमार गंगावाल,**
**प्लॉट नबंर ७४-३७-४,**
**लेबर कॉलनी, फाजलपुरा,**
**औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००१०२६६२९४) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत**
**शहर विभाग औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | | |
|---|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | | **अध्यक्ष** |
| | **प्र. अ.** | **सगणे** | **सदस्य/सचिव** |

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक १७/०७/२००९ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक ०४/०८/२००९ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराने महावितरण कंपनीकडुन घरगुती वीज वापरा करीता विद्युत पुरवठा घेतलेला असुन त्यांचा ग्राहक क्रमांक ४९००१०२६६२९४ असा आहे अर्जदाराचे मिटर डिसेंबर २००४ मध्ये बदली करण्यात आले असुन त्यांना माहे डिसेंबर २००८ मध्ये एकदम २२०८२ युनिटचे अवास्तव वीज बिल प्राप्त झाले.वरील चुकीच्या वीज बिलाबाबत त्यांनी महावितरण कंपनीकडे तक्रार दाखल केल्यानंतर कनिष्ठ अभियंता यांनी स्थळ निरीक्षण करुन अहवाल दिला परंतु चुकीचे व अवास्तव देयक दुरुस्त करुन मिळाले नाही. त्यामुळे ग्राहकाने या मंचात तक्रार दाखल करुन सुधारीत वीज बिल देण्याबाबत तसेच व्याज व दंडाची रक्कम रद्द करण्याबाबत विनंती मंचास केली आहे.मंचाने तक्रार दाखल करुन घेऊन सुनावणीची तारीख दिनांक ०४/०८/२००९ रोजी ठेवण्यात आली.

२) दिनांक ०४/०८/२००९ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये महावितरणतर्फे नोडल अधिकारी श्री जी.एस. राठौर उपस्थित होते व सहाय्यक लेखापाल श्री एन.जी. भाले आणि वीज ग्राहक श्री चंद्रशेखर गंगवाल उपस्थित होते.वीज ग्राहकाने माहे डिसेंबर २००८ मध्ये २२०८२ युनिटचे एकत्रीत देयक प्राप्त झाल्याचे सांगितले. वरील देयकाबाबत त्यांनी कनिष्ठ अभियंता फाजलपुरा यांच्याकडे तक्रार दाखल केल्यानंतर दिनांक २०/०१/२००९ रोजी कनिष्ठ अभियंता यांनी स्थळ निरिक्षण करुन अहवाल सादर केला. त्या अहवालानुसार ग्राहकाचे मिटर रिडींग अवास्तव असल्याचे कारण सांगुन पुर्वीच्या सरासरीनुसार सुधारीत वीज देयक देण्याबाबत वरीष्ठाकडे अहवाल

सादर केला आहे. या अहवालाची प्रत ग्राहकाने मंचात दाखले केली असुन अहवालाप्रमाणे देयक दुरुस्ती झाले नसल्याचे प्रतिपादन केले. नोडल अधिकारी यांनी वरील ग्राहकाचे मिटर बदली करुन चाचणी करण्याकरीता चाचणी विभागाकडे पाठविल्याचे सांगुन मिटर चाचणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर देयकाची दुरुस्ती करण्यात येईल असे सांगितले. मंचाने नोडल अधिकारी यांना ग्राहकाचे सी.पी.एल.,मिटर बदली अहवालाची प्रत,मिटर चाचणी अहवाल,व प्रस्तावित वीज देयक दुरुस्ती अहवाल सादर करण्याचे सांगुन पुढील तारीख १८/०८/२००९ रोजी ठेवण्यात आली.

३) दिनांक १८/०८/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस नोडल अधिकारी यांचे प्रतिनिधी सहाय्यक अभियंता श्री तौर व वीज ग्राहक उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी स्थळ निरिक्षण अहवाल,मिटर चाचणी अहवाल,ग्राहकाचे सी.पी.एल.व सुधारीत देयक प्रस्ताव मंचात सादर केला. प्रस्तावानुसार ग्राहकास माहे डिसेंबर २००८ व जानेवारी २००९ मध्ये सरासरी १५० युनिट प्रतिमहा प्रमाणे वीज देयक करुन एकुण १५३२४३=९६/- रुपयाची वजावट दाखविण्यात आली. ही दुरुस्ती ग्राहकाने मान्य असल्याचे सांगितले. त्यामुळे प्रकरण निकासाठी ठेवले.

४) दोन्हीबाजुकडुन प्राप्त झालेल्या कागदपत्रावरुन असे दिसुन येते की, ग्राहकास दिनांक ३१/०३/१९७९ पासुन घरगुती विद्युत पुरवठा महावितरण कडुन करण्यात आला आहे. माहे नोव्हेबर २००८ पर्यंत ग्राहकाचा विद्युत बिलाबाबत कोणताही वाद नव्हता. त्यांना माहे डिसेबर २००८ मध्ये २२०८२ युनिट वापराचे एकत्रीत देयक देण्यात आले. या देयकाबाबत त्यांनी महावितरणचे कनिष्ठ अभियंता यांच्याकडे तक्रार दाखल केल्यानंतर कनिष्ठ अभियंता यांनी दिनांक २०/०१/२००९ रोजी स्थळनिरीक्षण करुन ग्राहकाचे मिटर रिडींग अवास्तव असल्यामुळे त्यांना पुर्वीच्या सरासरीनुसार वीज बिल आकारणी करावी असा अहवाल दिला आहे. परंतु वरील अहवालानुसार सुधारीत देयक देण्यात आले नाही. ग्राहकाचे मिटर बदली करुन त्यांना माहे

फेब्रुरवारी २००९ मध्ये नविन मिटर लावण्यात आले. व त्याची चाचणी करुन मिटर योग्य असल्याचा चाचणी अहवाल नोडल अधिकारी यांनी सादर केला आहे. माहे डिसेंबर २००८ पुर्वी ग्राहकाचा बारा महीन्याचा वीज वापर सरासरी १२२ युनिट प्रतिमहा दिसुन येतो. त्यामुळे ग्राहकास माहे डिसेंबर २००८ मध्ये देण्यात आलेले २२०८२ युनिट चे देयक अवास्तव व चुकीचे असल्याचे मंचाचे मत आहे. तसेच कनिष्ठ अभियंता यांच्या अहवालात सुध्दा ग्राहकाचा वीज भार गृहीत धरुन वरील देयक हे अवास्तव असल्याचे नमुद केले आहे.

# आदेश

१) महाविरणतर्फे ग्राहकास देण्यात आलेले माहे डिसेंबर २००८, व जानेवारी,फेब्रुवारी २००९ ची वीज देयके रद्द करण्यात येत आहे. त्याऐवजी ग्राहकास वरील कालवधीकरीता १५० युनिट प्रति माह याप्रमाणे सुधारीत वीज देयक १५ दिवसांच्या आत देण्यात यावे.

२) वरील देयकात कोणतेही व्याज व दंडाची आकारणी करु नये व वरील कालावधीत ग्राहकाने भरलेल्या देयकाची रक्कम सुधारीत वीज देयकातुन वजा करवी.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

**प्र. अ. सगणे**
**सदस्य/सचिव**

**विष्णु अं. हंबिरे**
**अध्यक्ष**

ग्राहक गा-हाणे निवारण मंच
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.
जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/२३७/२००९/७१** **दिनांक :-**

**प्रति,**
श्री चंद्रशेखर अशोककुमार गंगावाल,
प्लॉट नबंर ७४-३७-४,
लेबर कॉलनी, फाजलपुरा,
औरंगाबाद.
(ग्राहक क्र.४९००१०२६६२९४)

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/२३७/२००९/७१ )

आपण दिनांक १७/०७/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

सदस्य/सचिव
ग्राहक गा-हाणे निवारण मंच
म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.

प्रती, सविनय सादर,
मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय,
म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.

प्रती,कार्यकारी अभियंता (प्रशासन),
अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,
म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद
माहिती व उचीत कारवाही करीता

विद्युतलोकपालाचा पत्ता,
विद्युत लोकपाल,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,
६०६-६०८, केशवा, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.
दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.